निसर्ग, समाज आणि अर्थकारण हे विकासाच्या मनोऱ्याचे तीन आधारस्तंभ. या तिन्हींमध्ये समन्वय राहणं ही शाश्वत विकासाची खरी वाट. परंतु समाजघटक म्हणून आपण जेव्हा अर्थकारणाकडे अधिक झुकतो, तेव्हा निसर्गाची हाक जणू ऐकणंच थांबवतो. या तिन्ही स्तंभांमध्ये तोल साधत प्रगतीचे वाटसरू कसे होऊ शकतो, याचंच भान हरवून बसतो. ही हाक ऐकणारी शाश्वत जीवनशैली आणि त्यानुरूप सामाजिक–आर्थिक व्यवहारांचा अंगीकार ही आजच्या काळाची गरज आहे. सर्वसामान्य माणसाला हे शक्य व्हावं, अशा पर्यावरणस्नेही तंत्रज्ञानाचा विकास हेच पुणेस्थित प्राज इंडस्ट्रीज या भारतीय बहुराष्ट्रीय कंपनीचं व्यवसायक्षेत्र!

# शाश्वत विकासवाटेवरील प्राज-पर्व

**विद्याधर कुलकर्णी**


'प्राज'ची वाटचाल डिसेंबर १९८३ मध्ये सुरू झाली. कंपनीची स्थापना झाली, तीच स्वदेशी तंत्रज्ञानावर आधारित, या मातीशी जोडलेला, नावीन्यपूर्ण उद्योग सुरू करण्याच्या मनसुब्यातून. त्याला पार्श्वभूमीही तशीच होती. प्रमोद चौधरी हे या कंपनीचे संस्थापक-कार्यकारी अध्यक्ष. ते स्वतः स्वातंत्र्याची पहाट नुकतीच उगवलेल्या भारतात जन्मलेले आणि पश्चिम महाराष्ट्रात जडणघडण झालेले पहिल्या पिढीचे उद्योजक. आजोबा स्वातंत्र्यसैनिक. कुटुंब मध्यमवर्गीय. त्यामुळे घरातले संस्कार देशप्रेमाचे, शिस्तीचे आणि शिक्षणानं आयुष्य समृद्ध करण्याचे.

त्यातूनच, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये (आयआयटी बॉम्बे) यंत्र अभियांत्रिकीचं शिक्षण घेतल्यानंतर प्रमोद चौधरींनी परदेशातल्या सुखवस्तू नोकरीची आस न धरता भारतातच राहणं पसंत केलं. एका तपाहून थोडा अधिक काळ नोकरीचा अनुभव घेत त्यांनी स्वतःचा उद्योग सुरू करण्याच्या खंदकात उडी घेतली. त्यातून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) भोसरीतील संकुलात 'प्राज'च्या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवली गेली.

एका साखर कारखान्याला डिस्टिलरी प्रकल्पासाठी लागणारे तंत्रज्ञान व यंत्रसामग्री पुरवण्यापासून या कंपनीची वाटचाल सुरू झाली आणि लवकरच या क्षेत्रात 'प्राज'चं नाव होऊ लागलं. आयसीआयसीआयनं साहसवित्त गुंतवणुकीच्या स्वरूपात या कंपनीला भरारी घेण्यासाठी दिलेलं बळ ही त्या सुरुवातीच्या काही वर्षातल्या यशस्वी वाटचालीची पोचपावतीच होती.

एव्हाना 'प्राज'नं इथेनॉल उत्पादनासाठीचं संशोधन व विकास केंद्र स्थापन केलं आणि स्थापनेला एक दशक पूर्ण होण्याच्या आतच या कंपनीनं उभे केलेले इथेनॉल प्रकल्प देशाच्या विविध भागांत कार्यान्वितही झाले! १९९४ मध्ये कंपनीनं भांडवल बाजारात आणलेल्या इनिशिअल पब्लिक ऑफरिंगला (आयपीओ) मिळालेला अफाट प्रतिसाद ही त्याचीच प्रचिती होती.

अर्थात, कोणत्याही प्रवासाप्रमाणे 'प्राज'लाही चढ-उतार अनुभवावे लागलेच. १९९७ मध्ये उद्भवलेला आसियान देशांतील आर्थिक पेच हा त्यांपैकीच एक. परंतु नव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत त्यातून सावरून कंपनीनं भारतातील इथेनॉलची ७० टक्के बाजारपेठ काबीज केली, तसेच जागतिक बाजारपेठेतही नाव कमाविण्यास सुरुवात केली. २००४ पर्यंत तर एक अब्ज रुपये उलाढालीचा मोठा टप्पाही गाठला. त्यापाठोपाठ राकेश झुनझुनवाला, विनोद खोसला आणि रतन टाटा यांच्यासारख्या दिग्गजांनी या कंपनीच्या उज्ज्वल भविष्यात गुंतवणूक केली आणि नावीन्यपूर्ण स्वदेशी तंत्रज्ञानाच्या एका वाटचालीला कूस बदलण्यासाठी हीच संधी मिळाली.



प्रमोद चौधरी, संस्थापक आणि कार्यकारी अध्यक्ष, प्राज इंडस्ट्रीज




'प्राज'नं आता मॅट्रिक्स ही स्वतंत्र आणि सुसज्ज अशी संशोधन आणि विकास प्रयोगशाळाच उभारली. तोवर सातत्यानं फुगत चाललेल्या खनिज तेलाच्या किमतींमुळे इथेनॉलकडे पर्यायी इंधन म्हणून पाहिलं जाऊ लागलं होतंच. परंतु त्यासाठी शेतमालाचा वापर होणं हे वादविषय होऊ लागलं आणि त्यातून इथेनॉल निर्मितीसाठी पर्यायी तंत्रज्ञानाची गरज व्यक्त होऊ लागली. दुर्दैवानं पुन्हा एकदा अमेरिकी अर्थव्यवस्थेत निर्माण झालेल्या २००८ मधील पेचानं जगाला पुन्हा मंदीच्या विळख्यात ओढलं आणि 'प्राज'लाही पुन्हा झळ सोसावी लागली.

परंतु रात्रीच्या उदरातच उद्याचा उषःकाल असतो, याची खात्री बाळगून या कंपनीनं स्वतःच्या वाटेवरून न ढळता संशोधन व विकास कार्य कायम ठेवलं. तंत्रस्वयंपूर्णतेच्या ध्यासातून उभ्या केलेल्या प्राज मॅट्रिक्स या संस्थेत डॉ. चौधरी यांनी वाया जाणाऱ्या शेतमालापासून इथेनॉल निर्मितीचं तंत्रज्ञान विकसित केलं. त्याच्या पथदर्शी प्रकल्पाचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते २०१६ मध्ये उद्घाटन झालं.

केंद्र सरकारनं 'मेक इन इंडिया'चा संकल्प सोडला तेच हे वर्ष. 'प्राज'नं तर त्या दिशेनं आधीच पाऊल उचललं होतं. त्याला आता अधिकच गती मिळाली. उसाचं पाचट, गव्हाचे काड, ज्वारीचे धाट, तांदळाचे ताट, मक्याचे दाणे काढलेला कणसाचा भुट्टा, कापसाचे देठ हा सर्व प्रकारचा शेतकचरा हा शेतकऱ्यांना संपत्ती देणारा ठरू शकेल, अशा या तंत्रज्ञानामध्ये तेल कंपन्यांनीही रस दाखवून त्यासाठीचे शोधन प्रकल्प उभारण्याची जबाबदारी 'प्राज'वर सोपवली. परंतु एवढ्याच यशावर समाधानी न राहता कंपनीने टाकाऊ शेतमालापासून संपीडित जैववायूनिर्मितीचं (कॉम्प्रेस्ड बायोगॅस-सीबीजी) तंत्रज्ञानही विकसित केलं आहे. एवढंच नव्हे, तर हवाई आणि सागरी वाहतुकीसाठीचं जैवइंधनही 'प्राज'मध्ये आता विकसित केलं जात आहे. पर्यावरणस्नेही पर्यायी इंधननिर्मितीचा हा पट म्हणजे 'प्राज'च्या यशोमुकुटातील मानाचा तुराच ठरत आहे.

स्वनिर्मितीची वाट चोखाळण्याच्या या प्रयत्नामागे 'प्राज मॅट्रिक्स'ची भूमिका कळीची ठरली आहे. आजवर केल्या गेलेल्या सुमारे १००-११० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून ८०,००० चौरस फुटांवरील विस्तीर्ण क्षेत्रात १६ सुसज्ज प्रयोगशाळा उभ्या राहिल्या आहेत. या क्षेत्रातील ९० हून अधिक अभ्यासक व तंत्रज्ञ तिथं कार्यरत आहेत आणि केंद्र सरकार प्रमाणीकृत संशोधन व विकास केंद्र म्हणून या प्रयोगशाळेला मान्यताही मिळाली आहे.

हवामानबदलाच्या आव्हानाचा समर्थपणे मुकाबला करण्यास मोलाचा हातभार लावणाऱ्या जैवचलत्वाच्या (बायोमोबिलिटी) क्षेत्रातील या यशानंतर जैवलोलकाची (बायोप्रिझम) संकल्पनाही 'प्राज'नं प्रत्यक्षात आणण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार, अक्षय रसायने आणि साधनांच्या (रिन्युएबल केमिकल्स अँड मटेरिअल्स - आरसीएम) क्षेत्रातही कंपनीनं प्रवेश केला आहे. वाहन, वेष्टन, गृहसजावट, बांधकाम, शेती आणि खाद्यान्न अशा अनेकविध क्षेत्रांत हे तंत्रज्ञान आमूलाग्र परिवर्तन करेल, अशी चिन्हे आहेत.

तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, उत्पादन, प्रकल्प व्यवस्थापन आणि कंपनी प्रचालन (ऑपरेशन्स) या पाच क्षेत्रांत कंपनी जगभर ठसा उमटवीत आहे. त्यातून पर्यावरणस्नेही औद्योगिक जैवतंत्रज्ञानाचा प्रसारही झपाट्यानं होत आहे. त्यातही इंधनाप्रमाणेच पाणी ही देखील संपत्ती होऊलागल्याच्या जाणिवेतून कंपनीनं उद्योगांची गरज असणारं हाय प्युरिटीच्या रूपातलं पाणी आणि उद्योगांच्या प्रक्रियांमधून बाहेर पडणारं सांडपाणी रूपातलं पाणी यांमध्येही स्वतःचा ठसा उमटवला आहे. औषधनिर्मिती क्षेत्रासाठीच्या जलशुद्धीकरण तंत्रज्ञानात (हाय प्युरिटी सिस्टम्स) कंपनीनं २००८ मधल्या मंदीच्या तडाख्यातून सावरतानाच क्षेत्रविस्तार केला होता. आता औद्योगिक सांडपाणी व्यवस्थापनाच्या क्षेत्रातही प्रवेश करताना ही कंपनी शून्य जलविसर्ग (झीरो लिक्विड डिस्चार्ज - झेडएलडी) ही संकल्पना रुजवू पाहत आहे.

नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा ध्यास घेत सुरू केलेली ही उद्यमशीलता आता चार दशकांच्या पूर्ततेच्या दिशेनं घोडदौड करत आहे. पाच खंडांतल्या ७५ हून अधिक देशांत या कंपनीची पताका फडकत आहे. डॉ. चौधरी यांचं नेतृत्व आणि त्यांनी तंत्रज्ञानाची धरलेली कास, नावीन्याच्या घेतलेला ध्यास व आपल्या सहकाऱ्यांवर दाखवलेला विश्वास यांची ही परिणती आहे. आंत्रप्रेन्युअरशिपप्रमाणेच इंट्राप्रेन्युअरशिपचा पुरस्कार हेही या यशाचं गमक म्हणता येईल. आपल्या सहकाऱ्यांतले नेतृत्वगुण आणि निर्णयक्षमता यांना संधी देत त्यांच्यातली दायित्वभावना वाढीला लावणे म्हणजे इंट्राप्रेन्युअरशिप. ती या कंपनीमध्ये सर्व स्तरांवर रुजली आहे. जगातील प्रगत जैवअर्थव्यवस्थांमधली नोकरी करण्यायोग्य सर्वोत्कृष्ट कंपनी म्हणून 'प्राज'चा २०२०मध्ये झालेला गौरव ही त्याचीच तर पोचपावती आहे!

शाश्वततेचा पुरस्कार 'प्राज'नं केवळ आपल्या व्यावसायिक वाटचालीतच नव्हे, तर सामाजिक उत्तरदायित्वातही केला आहे. कंपनीनं आपल्या सामाजिक उपक्रमांसाठी (सीएसआर) आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण ही तीन क्षेत्रं निश्चित केली आहेत. प्राज फाउंडेशनमार्फत २००४ पासून हे कार्य सुरू आहे. याखेरीज, प्राथमिक स्तरावरील तंत्रज्ञानाची ओळख करून देण्याचा उपक्रम पश्चिम महाराष्ट्रातल्या आठ जिल्ह्यांच्या ग्रामीण भागांतील १३ शाळांमधून ही कंपनी राबवत आहे.

पर्यावरणस्नेह आणि तंत्रस्नेह यांचा सांधा जुळवण्याचा विचार हे व्यावसायिक आणि सामाजिक या दोन्ही आघाड्यांवर डॉ. चौधरी यांनी प्रत्यक्षात आणला आहे. त्यामुळेच तर ते २०२० मधल्या जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. औद्योगिक जैवतंत्रज्ञान क्षेत्रातला हा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे ते पहिलेच भारतीय आणि केवळ दुसरे आशियाई आहेत. दिल्लीस्थित सी.आय.आय. (कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज) च्या राष्ट्रीय समिती तसेच जैवइंधनासंबंधीच्या विविध समित्यांद्वारे कर्बरहित इंधनांच्या बाबतीतील ध्येयधोरणांचा पाठपुरावा त्याचबरोबर पुणे स्थित मराठा चेंबर (एम.सी.सी.आय.ए.) च्या माध्यमातून स्थानिक उद्योगक्षेत्राच्या वाढीसाठी त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. २०२१मध्ये तर 'प्राज'नं प्रगत जैवअर्थव्यवस्थांमधल्या पहिल्या पन्नास कंपन्यांच्या यादीत दुसऱ्या क्रमांकावर झेप घेऊन आपल्या उज्ज्वल भवितव्याची झलकच जगाला दाखवली आहे!

शाश्वत जीवनशैलीच्या उद्दिष्टांशी सुसंगत अशाच विकासवाटा दाखवत असल्यामुळे 'प्राज'चं अलीकडच्या काळातील प्रत्येक यशस्वी वळण हे संपूर्ण जगाचं लक्ष वेधून घेत आहे. कंपनीला अलीकडे सातत्यानं मिळत असलेले मानसन्मान ही त्याचीच परिणती आहे. तंत्रज्ञान आणि नावीन्य यांची कास धरूनच आपण उद्याच्या भारताचं सुखावह स्वप्न साकारू शकतो, असं कार्व्हर पुरस्कार स्वीकारताना डॉ. चौधरी म्हणाले होते. त्या स्वप्नक्षितिजावर 'प्राज' आता शाश्वत रंगभरण करत आहे.

